TELEGRAM : SAHASANGH
E-mail - Sahasangh@yahoo.in
WWW.Co-operativeonnet.com

Phone No. : ०२० - २६१२२६४० / २६१२९५८४
Fax No. : ०२० - २६११९०३३

# दि महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे

**५ बी.जे. रोड, पुणे - ४११ ००१.**

नोंदणी क्रमांक : १९८५ दि. १३ जुलै १९१८

**जा.क्र. : प्रशासन / वि.सभा / २०८८ / २०१२-१३** **दि. २२/३/२०१३**

**( फक्त सभासदांसाठी )**

**विषय :- विशेष साधारण सभेची सूचना**

**महाशय,**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणेच्या संस्था व व्यक्तीगत सभासदांना कळविण्यात येते की, संघाची विशेष साधारण सभा संघाचेअध्यक्ष मा. ॲड. श्री.सुहासराव भ. तिडके यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक १०.४.२०१३ रोजी दुपारी २.३० वाजता महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे पद्मभुषण वसंतदादा पाटील सभागृह, ५ बी.जे.रोड, पुणे - ४११००१ येथे पुढील कामकाजाकरीता बोलविण्यात येत आहे. तरी कृपया सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) संघाचे नवीन उपविधीस मान्यता देणे.
२) संघाचे नवीन सेवा नियमास मंजूरी देणे.
३) सन २०१२-१३ व २०१३-१४ साठी वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्याचा मेहनताना ठरविणे.
४) गा-हाणे, समझोता व निवारण समिती गठीत करणे.
५) संघ शासनाने टेक ओव्हर करणे बाबत.
६) बी.ओ.टी.बाबत बी.ओ.टी. समितीचे झालेले ठराव, संचालक मंडळाचे झालेले ठराव, सर्व साधारण सभेचे झालेले ठराव, सर्व ठराव र- करणे.
७) मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करणे.

कळावे, ही विनंती.

**आपला विश्वासू,**

**( वसंतराव र.देशमुख )**
**मानद सचिव**
**महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे**

**प्रत**
**संघाचे संस्था व व्यक्ती सभासद ( सर्व )**

**प्रत माहितीसाठी आदरपूर्वक रवाना :**
**मा.सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ( आदरपूर्वक )**

**( वसंतराव रं.देशमुख )**
**मानद सचिव**
**महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे**

**विशेष सूचना :**

१. संघाची सदरची विशेष साधारण सभा कोरम (गणपूर्ती) अभावी तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी होईल. त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. या सभेत मुळ सभेच्या विषयपत्रिकेवरील विषयावर विचार होईल.

२. ज्या सहकारी संस्था सभासदांनी विशेष साधारण सभेस हजर राहण्यासाठी आपले प्रतिनिधी नियुक्त केले असतील, त्या प्रतिनिधींनी सभेस हजर राहणे संदर्भातील त्यांच्या नावासहीत संस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेची ठरावाची प्रमाणीत प्रत सोबत आणावी.

३. तसेच सभेपुढे सादर केलेल्या विषयासंदर्भात आपणास काही सुचना / दुरुस्ती सुचवावयाची असल्यास अशी सूचना / दुरुस्ती राज्य संघाकडे दि. ६.४.२०१३ पर्यंत मिळेल या पध्दतीने पाठविणे आवश्यक आहे.

**( वसंतराव रं.देशमुख )**
**मानद सचिव**
**महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणे**

**टिप : विशेष साधारण सभा सुचना व विषयसुची तसेच संघाचे नवीन उपविधी**
**WWW.co-operativeonnet.com वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**